**तात्काळ कार्यवाहीसाठी**

जा.क्र.उमा२/कोवि/स्वंअशा/प्रमा/१८/ 15660-65
शिक्षण उपसंचालक कार्यालय, कोल्हापूर
विभाग, कोल्हापूर
दिनांक - 4 JUL 2018

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, कोल्हापूर विभाग.

विषय- स्वंयअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त उच्च माध्यमिक शाळांच्या प्रथम मान्यता व नैसर्गिक मान्यतेबाबत

१) सन २०१६-१७ मधील शाळांचे नूतनीकरणाने सन २०१७-१८ मध्ये इ. ११ वी ची प्रथम मान्यता
२) नव्याने परवानगीच्या सन २०१७-१८ व २०१८-१९ पासून सुरु केलेल्या इ. ११ वी च्या उच्च माध्यमिक शाळा
३) सन २०१८-१९ मधील इ. १२ वी चे नैसर्गिक वाढीने वर्ग मान्यतेबाबत

वरील विषयाच्या अनुषंगाने कळविणेत येते की, शालेय शिक्षण विभागाकडील शासन निर्णयान्वये शासनाने स्वंय अर्थसहाय्यित तत्वावर उच्च माध्यमिक शाळा सुरु करणेस परवानगी दिलेली आहे अशा शाळा/संस्थाना या कार्यालयाकडून परवानगी कळविणेत आलेली आहे. व त्यानुसार आपल्याकडून उच्च माध्यमिक शाळांचे प्राप्त प्रस्तावानुसार प्रथम मान्यता व नैसर्गिक वाढीने मान्यताही देणेत आलेल्या आहेत.

तथापि सन २०१७-१८ मध्ये नव्याने /नूतनीकरणाने उच्च माध्यमिक शाळा सुरु झालेल्या शाळांचे प्रथम मान्यतेसाठीचे प्रस्ताव अदयापही या कार्यालयास सादर झालेले नाहीत. तसेच काही शाळांचे प्राप्त प्रस्तावामध्ये त्रुटी असलेने त्रुटी पूर्ततेसाठी कळविणेत आलेले आहे. अशा सर्व उच्च माध्यमिक शाळांचे प्रथम मान्यतेचे प्रस्ताव तात्काळ या कार्यालयास सादर करावेत. वास्तविक सन २०१७-१८ मधील इ. ११ वी चे प्रथम मान्यतेचे प्रस्ताव या कार्यालयास उशीरात उशीरा डिसेंबर २०१७ पर्यंत प्राप्त होणे आवश्यक होते.

सन २०१७-१८ मध्ये इ. ११ वी चे वर्ग सुरु झालेल्या ज्या शाळांची अदयापी प्रथम मान्यता झालेली नाही. अशा उच्च माध्यमिक शाळांची इ. ११ वी प्रथम मान्यता , इ. १२ वी नैसर्गिक वाढीने वर्ग मान्यता व त्यानंतर बोर्ड सांकेतांकासाठीचा प्रस्ताव या बाबींचा विचार करता सदरच्या बाबी वेळेत पूर्ण करणे अत्यंत जिकीरीचे आहे. यामुळे सदर शाळांचे बोर्ड सांकेतांक प्रस्ताव वेळेत माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडे सादर न झालेस विदयार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता निर्माण होते.

**सबब, प्रथम मान्यतेसाठीचे प्रस्ताव विनाविलंब या कार्यालयाच्या वेबसाईट (dydekop.org) वर** प्रसिध्द चेकलिस्टनुसार व आपल्या तपासणी अहवालासह तसेच स्पष्ट अभिप्रायासह या कार्यालयास सादर करावेत. याबाबत आपलेस्तरावरुन संबंधित उच्च माध्यमिक शाळांना तात्काळ कळविणेत यावे. जेणेकरुन उपरोक्तप्रमाणे वेळेत कार्यवाही पूर्ण करणे शक्य होईल. अन्यथा विलंबाने होणा-या संबंधित शाळांच्या कोणत्याही प्रकारच्या नुकसानीस हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

**सबब, उपरोक्त प्रमाणे प्रथम मान्यतेचे व नैसर्गिक वाढीचे प्रस्ताव दि. १५/७/२०१८ पूर्वी परिपूर्ण सादर केले जातील याबाबत योग्य ती कार्यवाही करणेत यावी.**

( किरण लोहार )
प्र. शिक्षण उपसंचालक,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

प्रत- अध्यक्ष/सचिव/मुख्याध्यापक, संबंधित सर्व परवानगी प्राप्त स्वंय अर्थसहाय्यित शाळा/संस्था यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

२/- ज्या सुरु असलेल्या शाळांनी इ. ११ वी प्रथम मान्यता व इ. १२ वी ची नैसर्गिक वाढीने मान्यता घेतलेली नाही अशा शाळांनी तात्काळ शिक्षणाधिकारी यांचेकडे प्रस्ताव सादर करुन शिक्षणाधिकारी यांचे तपासणी अहवालासह प्रस्ताव या कार्यालयास वेळेत सादर करण्याची दक्षता घ्यावी. ( या कार्यालयाची वेबसाईटवर प्रथम मान्यता प्रस्ताव चेकलिस्ट प्रसिध्द करणेत आलेली आहे.) वेळेत प्रथम मान्यता, इ. १२ वी मान्यता व बोर्ड सांकेतांक याबाबी पूर्ण न झाल्यामुळे होणा-या नुकसानीस आपण स्वत: जबाबदार राहाल याची गांभीर्याने नोंद घ्यावी.